## प्रकरण पाचवे

# स्त्रीच्या शैक्षणिक पीछेहाटीची कारणमीमांसा

: मुलांच्या शैक्षणिक वंचिततेची कारणमीमांसा --

अभ्यासासाठी निवड केलेल्या दोन्ही खेड्यातील शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पाहणीमध्ये मुले शिक्षणापासून वंचित राहण्यास केवळ एकच-एक असे कारण जबाबदार असल्याचे आढळून आले नाही तर सामाजिक परिस्थिती,आर्थिकस्थिती,कौटुंबिक पर्यावरण आणि शैक्षणिक पार्श्वभूमि इत्यादी प्रमुख कारणे प्रामुख्याने प्रभावीपणे जबाबदार असल्याचे निदर्शनास आले. या सर्वकारणांचा सविस्तरपणे मागोवा घेतल्यानेच मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागील जबाबदार परिस्थितीचे सम्यक अकलन होऊ शकते.

(अ) सामाजिक परिस्थिती --

मुलांच्या सर्वांगिण विकास साधण्यासाठी अनुकूल सामाजिक परिस्थितीचा वाटा मोठा असतो. समाजातील व्यक्तींच्या व्यक्तीमत्वाचा विकास आणि अपेक्षित समाजिकरण होते यामध्ये सामाजिक परिस्थितीचा वाटा मोठा असतो. परंतु समाजात अनेक अनिष्ट प्रथा, परंपरा,सवयी आणि दृष्टिकोण असे आहेत की ज्यामुळे मुलांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये बाधा निर्माण होते आणि मुलांना शिक्षणापासून वंचित राहणे भाग पडते. अभ्यासासाठी निवड केलेल्या दोन्हीही खेड्यांच्या पाहणीमध्ये प्रतिकूल ग्रामीण सामाजिक परिस्थितीचा काही मुलांच्या शिक्षणावर अनिष्ट परिणाम झाला असल्याचा आढळून आले आहे. या सामाजिक परिस्थितीमध्ये प्रामुख्याने पालकांचे व्यसन,उनाड मुलांची संगत, शेजारचे सामाजिक पर्यावरण आणि मुलांचे मित्र इत्यादी घटक समाविष्ट होतात. या सर्व घटकांचे सविस्तरपणे आकलन करुन घेऊन मुलांच्या शैक्षणिक वंचिततेस सामाजिक पर्यावरण कसे परिणामकारी ठरु शकते हे पुढील विश्लेषणातून ध्यानात येईल.

१ : पालकांचे व्यसन :--

पाहणी केलेल्या दोन्हीही खेड्यातील शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. परंतु काही शेतकरी व शेतमजूर पालक दारु पित असल्याचे आढळून आले. दारु पिणाऱ्या पालकांचे प्रमाण तुलनेने अवंचित मुलांच्या पालकांच्यापेक्षा वंचित मुलांच्या पालकाचे अधिक असल्याचे निदर्शनास आले. दारु पिणाऱ्या पालकांना स्वतःच्या आणि त्यांच्या मुलांच्या भविष्याची चिंता असत नाही. मुलगा शाळेला जात नसेल तर शिकणे हे त्याच्या नशिबातच नाही म्हणून मुलाच्या नशिबावर हवाला ठेवून मद्यपी पालक रिकामे होतात. मद्यपी पालकांच्याकडून त्यांच्या मुलांना योग्य असे मार्गदर्शन होत नाही. शिवाय असे पालक घरातील व घराबाहेरील शेतीची व अन्य कामे करत नाहीत त्यामुळे मुलांना घरातील,घराबाहेरील शेतीची आणि अन्य स्वरुपाची कामे करावी लागतात. अर्थात, अशा पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जाणीव आणि महत्व पटलेले नसते, त्यामुळे पालक त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात आणि मुले शिक्षणापासून कायमची वंचित राहतात.

याशिवाय, जुगार खेळणारे पालक दोन्हीही खेड्यामध्ये अपवादानेच आढळले. जुगार खेळण्याचे हे प्रमाण काहीअंशी अधिक शहरी संपर्कात आलेल्या मौजे - सांगाव खेड्यातील अनुसूचित जातींच्या पालकांच्यामध्ये आढळले तर अवंचित मुलांचे कोणतेही पालक जुगार खेळत नसल्याचे आढळून आले. साधारणतः जुगार खेळणाऱ्यापेक्षा दोन्हीही खेड्यामध्ये दारु पिणाऱ्यांचे प्रमाण अधिक आढळून आले. या विषयीची स्पष्ट कल्पना खाली दिलेल्या तक्त्यातील माहितीच्या विश्लेषणावरुन येऊ शकते.

| अनु. | जात | मुंगे जुगार खेळणारे | न खेळणारे | एकूण | दोन्ही लेखांची मिळून |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ६(३ | ७(४३.७५) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | २(४ | २(४०.००) | २(४०.००) | ५(१००.००) |
| ३ | लोहार | — | २(५०.००) | २(५०.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | ६(४ | ७(४६.६७) | ७(४६.६७) | १५(१००.००) |
| ५ | मांग | १(१(९.१०) | ५(४५.४५) | ६(५४.५५) | ११(१००.००) |
| ६ | चांभार | ३(३ | ६(६६.६७) | ६(६६.६७) | ९(१००.००) |
| | एकूण टक्केवारी | १८(०९.६७) | २९(४८.३३) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

| अनु. | जात | मुंगे जुगार खेळणारे | न खेळणारे | एकूण | दोन्ही लेखांची एकून |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ४(२ | ७(४३.७५) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | ३(७ | १(२५.००) | १(२५.००) | ४(१००.००) |
| ३ | लोहार | २(५ | १(२५.००) | १(२५.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | ४(२ | ७(५०.००) | ७(५०.००) | १४(१००.००) |
| ५ | मांग | — | ७(५३.८५) | ७(५३.८५) | १३(१००.००) |
| ६ | चांभार | १(११ | ७(७७.७८) | ७(७७.७८) | ९(१००.००) |
| | एकूण टक्केवारी | १४(३ | ३०(५०.००) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

वरील तक्ता क्रमांक १ आणि २ प्रमाणे व्यसनाच्या आधारे मुलांच्या वडील प्रतिसादकांचे वर्गिकरण केले असता, वंचित मुलांच्या ६० वडील-प्रतिसादकांपैकी ३६ ( म्हणजे ६०.०० टक्के ) वडीलांनी मद्य सेवन करीत असल्याचे सांगितले, तर अवंचित मुलांच्या ६० वडील-प्रतिसादकांपैकी ३६ ( म्हणजे ६०.०० टक्के ) वडीलांनी मद्य सेवन करीत नसल्याचे सांगितले. यावरुन वंचित मुलांच्या वडीलांमध्ये मद्य सेवन करण्याचे प्रमाण अधिक, तर अवंचित मुलांचे बहुतांशी वडील प्रतिसादक मद्य सेवन करणारे नसल्याचे आढळले. मद्य सेवन करणाऱ्या वंचित मुलांच्या वडिलांची जात पातळीवर तपासणी केली असता सर्वाधिक प्रमाण चांभार प्रतिसादकांमध्ये ( ६ म्हणजे ६६.६७ टक्के ) तर त्या जवळपास मराठा प्रतिसादकांमध्ये (१० म्हणजे ६२.५० टक्के ) आढळले. या उलट विशेष उल्लेखनीय बाब अशी की, अवंचित मुलांच्या मांग प्रतिसादकांपैकी कोणीही मद्य घेणारे नव्हते.

जुगाराच्या व्यसनासंबंधी वंचित आणि अवंचित मुलांच्या वडिलांचे विश्लेषण केले असता, वंचित मुलांच्या प्रतिसादकांपैकी अगदीच नाममात्र ( म्हणजे ३ टक्के ) हे जुगार खेळणारे होते, तर अवंचित मुलांच्या वडील प्रतिसादकांपैकी कोणीही जुगार खेळणारे नव्हते. हे नमुद करण्यासारखे आहे.

वरील तक्त्यातील माहितीच्या विश्लेषणावरुन बहुतंशी वंचित मुलांचे पालक मद्य घेणारे होते तर जुगार खेळणारे नाममात्र आढळले, तेव्हा अशा मद्यपी प्रतिसादांचे मुले शिक्षण घेण्यापासून दूर्लक्षित राहतात असे विधान करण्यास जागा आहे.

२ : उनाड मुलांची संगत --

दोन्हीही खेड्यांच्या पाहणी अंती मुलांचे पालक हे दिवसभर घरकाम, शेतीकाम आणि अन्य स्वरुपाच्या कामामध्ये गढून गेलेले आढळले. या पैकी बहुसंख्य पालकांना त्यांच्या मुलांच्याकडे लक्ष देण्यास सवड असत नाही. काही मुले पालकांच्या या दुर्लक्षतेचा फायदा घेतात आणि शाळेला न जाता गावातून

उनाडकी करणाऱ्या मुलांच्या टोळीत सामील होऊन क्रिकेट खेळणे, पत्यांनी खेळणे, शाहीरगाणे म्हणणे, रानातून आणि गावातून मजाकरत फिरणे, सिनेमा बघण्यास जाणे, जवळपासच्या खेड्यातील सणसमारंभ,उरुस,जत्रा,इत्यादी कार्यक्रमामध्ये सहभागी होणे इ. गोष्टी करण्यात वेळ खर्ची घालतात अशा मुलांना शाळेत जाऊन चारभिंतीच्या आत जवळ-जवळ आठ तास शिक्षकांच्या नियंत्रणाखाली कोंडुन रहाणे आवडत नाही. या शिवाय काही पालक त्यांच्या मुलांचे अतिलाड करतात, विशेषत: एकच अपत्य असणारे पालक मुलगा शाळेला जात नसल्यास, त्याने शाळेला जावे म्हणून मारणे किंवा रागावणे नाही. एकाअर्थाने पालक त्यांच्या मुलांच्या या वृत्तीस अप्रत्यक्षरित्या मान्यताच देतात, पुढे अशी मुले उनाडमुलांच्या संगतीने गावातून मजा करत फिरण्यात धन्यता मानतात आणि शेवटी शिक्षणापासून वंचित होतात. विशेषकरुन अशी मुले अज्ञानी आणि निरक्षर पालकांची अधिक असल्याचे निदर्शनास आले. या विषयी स्पष्ट कल्पना खालील तक्त्यावरुन येऊ शकते.

| अनु. | जात | उनाड पूर्ण करणारी | एकूण | दोन्ही सेल्यांची मिळून |
|---|---|---|---|---|
| १ | मराठा | २(१२.५०) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | — | २(४०.००) | ५(१००.००) |
| ३ | लोहार | १(२५.००) | २(५०.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | ३(२०.००) | ७(४६.६७) | १५(१००.००) |
| ५ | मांग | ३(२७.२७) | ६(५४.५५) | ११(१००.००) |
| ६ | चांभार | — | ६(६६.६७) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | ९(१५.००) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

| अनु. | जात | उनाड पूर्ण करणारी | एकूण | दोन्ही सेल्यांची मिळून |
|---|---|---|---|---|
| १ | मराठा | १(६.२५) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | १(२५.००) | १(२५.००) | ४(१००.००) |
| ३ | लोहार | १(२५.००) | १(२५.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | २(१४.२८) | ७(५०.००) | १४(१००.००) |
| ५ | मांग | २(१५.३८) | ७(५३.८५) | १३(१००.००) |
| ६ | चांभार | १(११.११) | ७(७७.७८) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | ८(१३.३३) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

मुलांच्या संगती संबंधी पालकांच्याकडून माहिती करून घेतली असता १२० प्रतिसादक कुटुंबापैकी २१ ( म्हणजे ३५.०० टक्के ) वंचित, तर १७ ( म्हणजे २८.३३ टक्के ) अवंचित मुले उनाडमुलांची संगत करणारी आढळली. म्हणजेच शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांचे, तुलनेने, उनाड मुलांच्या संगतीत राहण्याचे प्रमाण थोड्या फरकाने अधिक आहे. उनाड मुलांची संगत करणाऱ्या वंचित मुलांची जातपातळीवर माहिती करून घेतली असता त्यात मागासवर्गीय कुटुंबातील मुलांचे प्रमाण अधिक आहे. लोहार ३ ( म्हणजे ७५.०० टक्के ) , महार ७ ( म्हणजे ४६.६७ टक्के आणि मांग ४ ( म्हणजे ३६.३६ टक्के ) या प्रमाणात वंचित मुले उनाड मुलांची संगत करीत असल्याचे आढळले. या उलट अवंचितामधून अशाच्या संगतीत राहणारांचे प्रमाण कमी आहे. परंतु तुलनेने महार आणि मांग या मागासवर्गीय कुटुंबातील मुलांचे उनाड मुलांच्या संगतीत राहण्याचे प्रमाण अधिक असल्याचे प्रकर्षाने आढळून आले.

३ : शेजारचे सामाजिक पर्यावरण --

दोन्हीही खेड्यांच्या पाहणीमध्ये काही पालकांनी सांगितल्याप्रमाणे खेड्यामध्ये मुलांच्या शिक्षणाला फारशी गती मिळत नाही कारण खेड्यातील मुलांना अनेक प्रकारची शेतीची, घरातील व अन्य स्वरूपाची कामे केल्याशिवाय गत्यंतर असत नाही अशा वातावरणातील मुलांच्या मनात शिक्षणाविषयी आवड किंवा गोडी निर्माण होत नाही. काही मुलांच्या शेजारील कुटुंबातील व्यक्ती मद्यपी आणि अनिष्ट वर्तनाच्या असतात, तर काही शेजारील कुटुंबातील-मुले शाळेला न जाणारी असतात. अशाप्रकारे , काही शेजारची कुटुंबे शैक्षणिक पार्श्वभूमिचा अभाव असलेली आढळली अशा शेजाऱ्यांच्याकडून मुलांच्या मनामध्ये शिक्षणाची प्रेरणा किंवा प्रोत्साहन दिले जात नाही. उलट शेजारच्या परस्पर कौटुंबिक स्पर्धात्मक वातावरणात मुलांच्या मनामध्ये शिक्षणाविषयी गैर समज निर्माण करण्याचा काही वेळा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या प्रयत्न होतो. आमका-आमका शिकून घरच्या शेतीतच राबतो आहे, शिकून त्याचा काय

उपयोग झाला ? अशा प्रकारे सुशिक्षित बेकार मुलांच्याकडे बोट दाखवून मुलांच्या मनात शिक्षणाविषयी आवड निर्माण न करता त्याला अप्रत्यक्षपणे शिक्षणाचा निरुपयोग असल्याचे सांगितले जाते. शिवाय कांही मुलांच्या पालकांनाही मुलांना शिक्षण देऊन त्यांना शेवटी नोकरी मिळण्याची आशा वाटत नाही. तसेच, पाहणी केलेल्या दोन्हीही क्षेत्रांमध्ये प्रतिकूल सामाजिक पर्यावरण लाभलेली मुले शिक्षणापासून अधिक प्रमाणात वंचित राहिलेली आढळून आली तर अनुकूल सामाजिक पर्यावरण लाभलेली बहुतांशी मुले शिक्षण घेत असल्याचे निदर्शनास आले. अशा प्रकारे मुलांच्या शिक्षणावर प्रतिकूल सामाजिक पर्यावरणाचा अनिष्ट परिणाम होतो हे सिध्द होते. या विषयीची स्पष्ट कल्पना खाली दिलेल्या तक्त्यातील माहितीच्या स्पष्टीकरणावरुन येऊ शकते.

मुलांच्या सामाजिक पर्यावरणासंबंधी माहिती करुन घेतली असता ३८ ( म्हणजे ६३.३३ टक्के ) वंचित मुलांना शेजारचे सामाजिक पर्यावरण प्रतिकूल असल्याचे त्यांच्या पालकांच्याकडून सांगण्यात आले. आणि ४७ ( म्हणजे ७८.३४ टक्के ) अवंचित मुलांना मात्र अनुकूल सामाजिक पर्यावरण असल्याचे पालकांनी सांगितले. यावरुन तुलनेने अवंचित गटातील अधिक मुलांना सामाजिक पर्यावरण अनुकूल होते, असे दिसून येते. जात पातळीवर तपासणी केली असता वंचित गटातील मांग ,९( म्हणजे ८१.८२ टक्के ), महार १२ (म्हणजे ८०.०० टक्के ) लोहार ३ ( म्हणजे ७५.०० टक्के ), सुतार ३ ( म्हणजे ६०.०० टक्के ) चांभार ४ (म्हणजे ४४.४४ टक्के ) आणि मराठा ७ (म्हणजे ४३.७५ टक्के ) या जातीतील मुलांना त्यांच्या शेजारचे सामाजिक पर्यावरण प्रतिकूल लाभले असल्याची माहिती त्यांच्या पालकांनी सांगितली. या उलट मराठा १५ ( म्हणजे ९३.७५ टक्के ), चांभार ८ ( म्हणजे ८८.८९ टक्के ), महार ११ ( म्हणजे ७८.५८ टक्के ), मांग ९ ( म्हणजे ६९.२४ टक्के ), सुतार आणि लोहार प्रत्येकी २ ( म्हणजे ५०.०० टक्के ) या जातीतील अवंचित मुलांना त्यांच्या शेजारचे सामाजिक पर्यावरण अनुकूल असल्याचे त्यांच्या पालकांच्याकडून सांगण्यात आले. यावरुन ज्यांना शेजारचे सामाजिक पर्यावरण प्रतिकूल लाभले त्यामध्ये वंचित मुलांचे प्रमान अधिक असल्याचे स्पष्ट होते. त्याच बरोबर मौजे - म्हाळुंगे खेड्यातील वंचित मुलांच्या पेक्षा मौजे - सांगाव खेड्यातील वंचित मुलांना प्रतिकूल सामाजिक पर्यावरन अधिक लाभलेले आढळले. तर मौजे - सांगाव खेड्यातील अवंचित मुलांच्यापेक्षा मौजे - म्हाळुंगे खेड्यातील अवंचित मुले अनुकूल सामाजिक पर्यावरणातील अधिक असल्याचे दिसून आले. मौजे - म्हाळुंगे खेड्यापेक्षा शहरी संपर्क लाभलेल्या मौजे-सांगाव खेड्यामध्ये शेजारचे सामाजिक - पर्यावरण मुलांच्या शिक्षणाला फारसे पोषक न बनता तेथे वंचित आणि अवंचित मुलांनाही मौजे-म्हाळुंगे खेड्याच्या सामाजिक पर्यावरणाच्या तुलनेत प्रतिकूल सामाजिक पर्यावरण असल्याचे आढळले. हा शहरी संपर्काचा परिणाम असावा की काय अशी शंका निर्माण होते.

( ब ) आर्थिक स्थिती --

पाहणी केलेल्या दोन्हीही खेड्यामध्ये दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणारे आणि आर्थिकदुरावस्था असलेले बहुसंख्य पालक आढळून आले. अवंचित मुलांच्या कुटुंबाच्या तुलनेत वंचित मुलांच्या पालकांची कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणारी अधिक असल्याचे निदर्शनास आले. मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास पालकांचे अज्ञान, निरक्षरता, शेजारचे प्रतिकूल सामाजिक पर्यावरण इत्यादी कारणांच्या बरोबरच त्यांच्या कुटुंबाचे दारिद्र्य हे किंबहुना अधिक प्रमाणात जबाबदार असल्याचे दिसून आले. कुटुंबाच्या दारिद्र्यामुळे बहुसंख्य पालक कुटुंबाच्या आर्थिक विवंचनेत गुरफटलेले असल्याने मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास त्यांना सवड असत नाही. काही पालक कुटुंबाचा उदरनिर्वाह चालावा यासाठी त्यांच्या मुलांचा घरकामासाठी, शेतमजूरीसाठी आणि अन्य स्वरुपाच्या कामासाठी उपयोग करुन घेतात, आणि कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालण्याचा प्रयत्न करतात. पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणापेक्षा कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची काळजी अधिक वाटते. या उलट जमिनीचे क्षेत्र अधिक असणाऱ्या पालकांना शेतीमध्ये काम करण्यासाठी अधिक लोकांची गरज वाटत असते, अशा वेळी काही पालक त्यांच्या मुलांचा शेतीकामासाठी उपयोग करुन घेतात. अशी मुले शैक्षणिकदृष्ट्या दुर्लक्षित होतात.यावरुन अल्पभूधारक आणि भूमिहीन पालकांची मुले त्यांच्या दारिद्र्यामुळे शिक्षण घेऊ शकत नाहीत. तर जमिनीचे क्षेत्र अधिक असणाऱ्या श्रीमंत पालकांची मुलेही त्यांच्या कुटुंबाच्या शेतीच्या कामामध्ये सहभागी व्हावे लागल्याने शिक्षण घेऊ शकलेले नाहीत. मात्र अशा वंचितांचे प्रमाण अत्यल्प आहे.

त्याचबरोबर दोन्हीही खेड्यातील पालकांनी सांगितल्याप्रमाणे मुलांना जनावरांना चारुण आणणे आणि वैरण आणावी लागणे याकामामुळे त्यांना शाळेला जाणे शक्य होत नसल्याचे सांगितले. काही पालकांच्या घरी तीन-चार म्हेशी, संकरीत गायी असल्याचे आढळून आले. या म्हेशींच्या आणि संकरीत

गायींच्या दुधापासून मिळणाऱ्या पैशातून त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक खर्च भागत असतो. त्यामुळे पालक मुलांना शाळेला न पाठवता म्हैशी आणि गायी चारुन आणण्यासाठी पाठवितात. काही पालक तर घरातील शेळ्या-मेंढ्या आणि कोंबड्याची राखन करण्यासाठी मुलांचा उपयोग करुन घेतात. अशा पालकांची बरीच मुले शिक्षणापासून अलिप्त राहिलेली आढळली. म्हाळुंगे खेड्यातील एका सुतार जातीच्या विधवा मातेने सांगितले की, नविन विकत घेतलेल्या म्हैशीला चारुन आणण्यासाठी मुलीला जावे लागत असल्यामुळे तीला शाळेला पाठविले नसल्याचे सांगितले. थोडक्यात, कुटुंबाचे दारिद्र्य, पशुपालन, शेतीची कामे इत्यादी कारणांच्यामुळे बरीच मुले शिक्षण घेत नसल्याचे निदर्शनास येते. शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्या आर्थिकस्थितीचा मागोवा घेता पालकांना त्यांच्या दारिद्र्यामुळे मुलांच्या शालोपयोगी वस्तूंची पूर्तता करता न येणे, मुलांचा व्यावसायिक कामात उपयोग करुन येणे, मुलांना रोजगारी-साठी बाहेर गावी जावे लागणे इत्यादी अनेक आर्थिक घटकांच्या प्रभावी परिणामामुळे बहुसंख्य मुले शिक्षणापासून वंचित राहिलेली निदर्शनास येतात.

१ : <u>शालोपयोगी वस्तूंची पूर्तता</u> --

दोन्हीही खेड्यांच्या अभ्यासांती बहुसंख्य पालक गरीब असल्यामुळे श्रीमंत पालकांच्या तुलनेत त्यांच्या मुलांना शालोपयोगी पाठ्य-पुस्तके, वह्या, पेन, पेन्सिल, पाटी, पिशवी आणि शाळेचा गणवेश इत्यादी वस्तूंची पूर्तता करु शकलेली नाहीत. शालोपयोगी वस्तूंची पूर्तता न करता आलेल्या पालकांची मुले अधिक वंचित आढळली. या संबंधीची स्पष्ट कल्पना पुढील तक्त्यातील माहितीच्या विश्लेषणावरुन येऊ शकते.

तक्ता न —

| अनु. | जात | शालोपयोगी पुरविणारे पा | एकूण | दोन्ही शेत्याची मिळून |
|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ६(३७.५०) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | – | २(४०.००) | ५(१००.००) |
| ३ | लोहार | – | २(५०.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | १(६.६७) | ७(४६.६७) | १५(१००.००) |
| ५ | मांग | २(१८.१८) | ६(५४.५५) | ११(१००.००) |
| ६ | चांभार | – | ६(६६.६७) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | ९(१५.००) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

तक्ताजन —

| अनु. | जात | मां शालोपयोगी पुरविणारे पा | एकूण | दोन्ही शेत्यांची मिळून |
|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ९(५६.२५) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | २(५०.००) | १(२५.००) | ४(१००.००) |
| ३ | लोहार | ३(७५.००) | १(२५.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | ६(४२.८६) | ७(५०.००) | १४(१००.००) |
| ५ | मांग | ४(३०.७७) | ७(५३.८५) | १३(१००.००) |
| ६ | चांभार | — | ७(७७.७८) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | २४(४०.००) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

शालोपयोगी वस्तूंच्या पूर्ततेनुसार वंचित आणि अवंचित मुलांच्या कुटुंबाची पाहणी केली असता ६० प्रतिसादक-पालकांपैकी शालोपयोगी वस्तूंची पूर्तता करणाऱ्या अवंचित मुलांच्या पालकांचे प्रमाण सर्वाधिक ( ५१ म्हणजे ८५.०० टक्के) आढळले. फक्त ९ पालक पुरेशी पूर्तता न करणारे आढळले. परंतु शालोपयोगी वस्तूंची पूर्तता करण्यास ४७ प्रतिसादक पालकांनी ( म्हणजे ७८.३३ टक्के ) गरिबी मुळे त्यांची असमर्थता व्यक्त केली. शालोपयोगी वस्तूंची पूर्तता न करणाऱ्या वंचित मुलांच्या कुटुंबाची जात पातळीवर तपासणी केली असता चांभार ९ ( म्हणजे १००.०० टक्के ), महार १४ ( म्हणजे ९३.३४ टक्के ) आणि मांग ९ ( म्हणजे ८१.८२ टक्के ) ह्या अनुसूचित जातीच्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक आढळून आले, तर त्या खालोखाल सुतार ४ ( म्हणजे ८०.०० टक्के ), लोहार ३ ( म्हणजे ७५.०० टक्के ) आणि मराठा ८ ( म्हणजे ५०.०० टक्के ) या इतर मागासवर्गीय जातीच्या कुटुंबाची संख्या आढळून आली. यावरून असे म्हणणे योग्य होईल की , शालोपयोगी वस्तूंची पूर्तता न करणाऱ्या चांभार,महार आणि मांग ह्या अनुसूचित जातीच्या कुटुंबाचे प्रमाण तुलनेने सुतार,लोहार आणि मराठा जातींच्या कुटुंबाच्या प्रमाणापेक्षा अधिक आहे.

२ : पालकांच्या व्यावसायिक कामात मुलांचा सहभाग --

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पाहणीमध्ये बहुसंख्य वंचित मुले तुलनेने अवंचित मुलांच्यापेक्षा पालकांना त्यांच्या व्यावसायिक कामात मदत करणारी आढळली. अर्थातही दोन्ही खेड्यामध्ये पाहणीसाठी निवडलेल्या सुतार,लोहार,मांग आणि चांभार जातीचे काही पालक त्यांच्या जातीचा व्यवसाय काही प्रमाणात करीत असल्याचे निदर्शनास आले. मराठा आणि महार जातीचे बहुतेक सर्व पालक शेतीचा व्यवसाय करणारे होते. लोहार आणि सुतार जातीचे पालक त्यांच्या काही मुलांचा रंदा ओढणे, भाता ओढणे, गाडीच्या चाकाचे बुट तयार करतेवेळी चाक फिरविणे, चाकाच्या धावा बसवतेवेळी तापलेल्या धावावर पाणी ओतणे इत्यादी कामासाठी उपयोग करून घेत होते. मांग जातीचे

पालक त्यांच्या मुलांचा फड आणणे, फोडणे, वाक तयार करणे, वाली तयार करतेवेळी चरखा फिरविणे, केरसूण्या तयार करणे इत्यादी कामामध्ये आणि तयार केलेले दोरकांडे, केरसून्या विकण्यासाठी बाजाराला ओझे घेऊन जाण्यासाठी काही मुला-मुलींचा उपयोग करत असल्याचे निदर्शनास आले. चांभार जातीचे पालक चप्पला तयार करतेवेळी, चप्पलांचा तळ, वेणी व अन्य चामडीवस्तू तयार करण्यासाठी त्यांच्या काही मुलांचा उपयोग करुन घेत असल्याचे दिसून आले. शिवाय अन्य स्वरुपाचे व्यवसाय करणारे पालक मदत म्हणून त्यांच्या मुलांचा उपयोग करीत असल्याचे आढळले. मौजे - सांगाव खेड्यातील मराठा जातीच्या एका पालकाचा जुगाराचा धंदा आहे त्या जुगाराच्या धंद्यावर काहीवेळेला मुलाला बसविले जाते. मौजे- सांगाव खेड्यातील महार जातीचा एक पालक गवंड्याचा धंदा करतो, गावंडीकामात मदत व्हावी म्हणून ते त्यांच्या मुलाला कामावर घेऊन जात असल्याचे आढळले. म्हाळुंगे खेड्यातील मांग जातीचे, एक पालक बैलांचा व्यापार आणि हेडगिरी करत असल्याचे दिसून आले, ते पालक त्यांचा मुलांचा बाजारातून बैले आणणे आणि घेऊन जाणेसाठी मदत म्हणून उपयोग करुन घेतात.अशा प्रकारे, पालकांना त्यांच्या व्यवसायात मदत करणारी बहुअंशी मुले वंचित राहिली. या विषयीची सविस्तर माहिती खालील तक्त्याच्या आधारे पाहता येईल.

त[illegible]र विभाजन —

| अनु. | जात | पालकांच्या का[illegible] साहाय्यक अस[illegible] मुले | एकूण | दोन्ही [illegible]ंची मिळून |
|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ७(४३.७५) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | १(२०.००) | २(४०.००) | ५(१००.००) |
| ३ | लोहार | १(२५.००) | २(५०.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | ६(४०.००) | ७(४६.६७) | १५(१००.००) |
| ५ | मांग | ५(४५.४५) | ६(५४.५५) | ११(१००.००) |
| ६ | चांभार | २(२२.२२) | ६(६६.६७) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | २२(३६.६७) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

त[illegible]सार विभाजन —

| अनु. | जात | पालकांच्या का[illegible] साहाय्यक अस[illegible] मुले | एकूण | दोन्ही [illegible]ंची मिळून |
|---|---|---|---|---|
| १ | मराठा | ६(३७.५०) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | १(२५.००) | १(२५.००) | ४(१००.००) |
| ३ | लोहार | — | १(२५.००) | ४(१००.००) |
| ४ | माहार | १(७.१४) | ७(५०.००) | १४(१००.००) |
| ५ | मांग | ४(३०.७६) | ७(५३.८५) | १३(१००.००) |
| ६ | चांभार | १(११.११) | ७(७७.७८) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | १३(२१.६७) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

पालकांना त्यांच्या व्यावसायिक कामात मदत करणाऱ्या वंचित आणि अवंचित मुलांची पाहणी केली असता व्यावसायिक कामात मदत करणाऱ्या वंचित मुलांचे प्रमाण अधिक (४७ म्हणजे ७८.३४ टक्के ), तर अवंचित मुलांचे प्रमाण कमी (२० म्हणजे ३३.३३ टक्के ) आढळले. यांची जातपातळीवर तपासणी केली असता मांग ११ ( म्हणजे १००.०० टक्के ), मराठा १४ ( म्हणजे ८७.५० टक्के ) महार १२ ( म्हणजे ८०.०० टक्के ) आणि चांभार ७ ( म्हणजे ७७.७८ टक्के ) जातीतील वंचित मुले पालकांच्या व्यावसायिक कामात मदत करणारी अधिक, तर सुतार २ ( म्हणजे ४०.०० टक्के ) आणि लोहार १ ( म्हणजे २५.०० टक्के ) जातीतील वंचित मुले कमी आढळली. त्याच बरोबर पालकांना त्यांच्या व्यावसायिक कामात मदत न करणाऱ्या अवंचित मुलांचे प्रमाण अधिक ( ४० म्हणजे ६६.६७ टक्के ) तर वंचित मुलांचे प्रमाण कमी (१३ म्हणजे २१.६६ टक्के ) आढळले. पालकांना त्यांच्या व्यावसायिक कामात मदत न करणाऱ्या अवंचित मुलांची जातपातळीवर तपासणी केली असता लोहार ४ ( म्हणजे १००.०० टक्के ), महार १२ ( म्हणजे ८५.७२ टक्के ), चांभार ७ ( म्हणजे ७७.७८ टक्के ) , सुतार ३ ( म्हणजे ७५.०० टक्के ) ,मराठा ८ (म्हणजे ५०.०० टक्के ), आणि मांग ६ ( म्हणजे ४६.१५ टक्के ) आढळले. यावरून पालकांना त्यांच्या व्यावसायिक कामात मदत करणाऱ्या वंचित मुलांचे प्रमाण अधिक असल्याचे स्पष्ट दिसते.

३ : <u>मुलांना अर्थार्जनासाठी बाहेरगांवा पाठविले जाणे</u> ---

पाहणी केलेल्या दोन्ही खेड्यात चांभार जातीच्या कुटुंबातील केवळ दोन मुले अर्थार्जनासाठी बाहेरगांवी पाठविले असल्याचे त्यांच्या पालकांनी सांगितले. परंतु पाहणीमध्ये निवड केलेल्या एकूण ६० वंचित मुलांच्या प्रतिसादक-पालकांच्या केवळ दोनच मुलांना अर्थार्जनासाठी बाहेरगांवी जावे लागले असल्याचे निदर्शनास आले असले तरी सर्वसाधारणपणे खेड्यातील गरीब पालक कुटुंबाचा उदरनिर्वाह चालावा किंवा कुटुंबाला आर्थिक साहाय्य व्हावे यासाठी बऱ्याच मुलांना

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कुणाच्यातरी संगतीने आणि ओळखीने त्यांची शाळा बंद करुन मुंबई किंवा अन्य शहरांच्या ठिकाणी कामासाठी पाठवितात. त्याच बरोबर खेड्यात कुणाच्यातरी कुटुंबातील मुंबई किंवा अन्य शहरातील काम करणारा मुलगा सणासुदीच्या दिवशी निटनेटका, स्वच्छ आणि आकर्षक पोषाख करुन खेड्यात परत आला की इतर कुटुंबातील पालकांना असे वाटते की त्यांच्या मुलांनी सुध्दा त्या मुलाप्रमाणे शहरात जाऊन एखादी नोकरी पत्करुन पैसे मिळवावेत. अशा - प्रकारचा हव्यास काही पालकांच्या मनात निर्माण होतो आणि असे पालक मुलांची शाळा बंद करुन नोकरीसाठी बाहेरगांवी मुलांना पाठवितात. याचाच- परिणाम मुले शिक्षणापासून वंचित राहण्यात होतो. म्हाळुंगे खेड्यातील एका चांभार जातीच्या पालकांने सांगितल्याप्रमाणे त्यांचा थोरला मुलगा मुंबईमध्ये बँकेत शिपाई म्हणून काम करतो, त्याने त्या बँकेच्या आसपास चप्पला दुरुस्त करणे व बुटपॉलिश करण्याचे एक खोके उभे केले आहे, त्यामध्ये चप्पला दुरुस्ती व बुटपॉलिशचे काम करण्यासाठी लहान मुलाला त्यांची शाळा बंद करुन मुंबईला नेले असल्याचे सांगितले. तर दुसरा चांभार जातीचा मुलगा शाळेला न जाता भोगावती सहकारी साखर कारखाना, शाहुनगर परिते येथे हंगामी ऊस वाहतूक करणाऱ्या बैल-गाडीवर काम करतो असे त्याच्या पालकाने सांगितले. अर्थात, पाहणीमध्ये केवळ दोनच मुले अर्थार्जनासाठी बाहेरगांवी पाठविली असल्याचे त्यांच्या पालकांनी सांगितले असलेतरी सर्वसाधारणपणे खेड्यातील गरीब कुटुंबातील बरीच मुले अर्थार्जनासाठी शहराच्या ठिकाणी नोकरीसाठी गेली असल्याचे दिसून येते. थोडक्यात पालकांचे दारिद्र्य हे त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास प्रभाविपणे जबाबदार असल्याचे पाहणी अंती निदर्शनास आले.

( क ) <u>कौटुंबिक पर्यावरण</u> --

मुलांचे योग्य व्यक्तीमत्व आणि समाजिकरण करण्यामध्ये कौटुंबिक पर्यावरणाचा वाटा मोठा आहे. मुलांचा जन्म हा कुटुंबामध्येच होत असल्यामुळे

मुलांच्या अनौपचारिक शिक्षणाची प्रथम सुरुवात कुटुंबातूनच होत असते, त्यामुळे कुटुंब ही मुलांना शिक्षण देणारी प्रथम शाळा आहे. कुटुंबामध्ये मुलांना त्यांच्या लहानपणापासून अनौपचारिकरित्या संपूर्ण समाजजीवनाच्या शिक्षणाचे डोस प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या पाजले जातात. या डोसावरच ब-या अर्थाने व्यक्तीच्या अंगी योग्य व्यक्तीमत्वाचे आणि समाजिकरणाचे बाळसे आलेले असते. परंतु यासाठी योग्य कौटुंबिक पर्यावरणाची अत्यंत आवश्यकता असते. अन्यथा व्यक्तीच्या योग्य व्यक्तीमत्वाची जडणघडण करणे शक्य नसते. व्यक्तीमनावर ब-यावाईट कौटुंबिक पर्यावरणाचा प्रभावी परिणाम होत असतो. त्यामुळे योग्य कौटुंबिक पर्यावरणातील मुलांचा व्यक्तीमत्वाचा योग्य विकास घडून येऊ शकतो. तर अनिष्ट कौटुंबिक पर्यावरण लाभलेल्या व्यक्तीच्या मनावर अनिष्ट परिणाम होऊन व्यक्ती योग्य सामाजिक जबाबदारी, भूमिका आणि कर्तव्यापासून ढळू शकते. अर्थात, शिक्षण हे व्यक्तीच्या मनाचा योग्य विकास आणि विचार करण्याची शक्ती निर्माण करण्यास अत्यावश्यक असते. आणि म्हणून त्यादृष्टिकोणातून समाजातील प्रत्येक व्यक्तीघटकाला शिक्षणाची संधी मिळायला हवी. परंतु दोन्ही क्षेत्रांच्या पाहणीअंती ब-याच पालकांची मुले शिक्षणाच्या संधीचा फायदा न मिळाल्यामुळे शिक्षणापासून वंचित राहिलेली आढळली.

सर्वसाधारणपणे अभ्यासासाठी निवड केलेल्या क्षेत्रामध्ये मुलांच्या पालकांचा वैवाहिक घटस्फोट, कौटुंबिक विघटन, कौटुंबिक मोडणे, कौटुंबिक अशांतता, कुटुंबातील लहान भावंडांना सांभाळण्याची जबाबदारी मुलांच्यावर पडणे आणि मुलांना कुटुंबातील अन्य कामे करावी लागणे इत्यादी कौटुंबिक पर्यावरणात्मक घटकांचा मुलांच्या शिक्षणावर परिणाम होऊन मुले शिक्षणापासून वंचित रहाणे, अगर न रहाणे यावर बरावाईट परिणाम झालेला आढळून आलेला आहे.

१ : मुलांच्या पालकांची वैवाहिक अगर कौटुंबिक स्थिती --

पाहणी केलेल्या दोन्हीही खेड्यामध्ये मुलांच्या पालकांच्या वैवाहिक आणि कौटुंबिक स्थितीचा त्यांच्या शिक्षणावर बरावाईट परिणाम झालेला आढळून आला. ज्या मुलांचे पालक वैवाहिक घटस्फोटित आणि कौटुंबिक विघटित होते अशा पालकांची बहुसंख्य मुले शिक्षणापासून वंचित राहिलेली आढळली. तर या उलट कौटुंबिक शांतता असलेल्या कुटुंबातील बहुसंख्य मुले शिक्षण घेत असलेली आढळली. मौजे - म्हाळुंगे खेड्यातील मांग जातीचा एक पालक वैवाहिक घटस्फोटित आणि कौटुंबिक विघटित असल्याचे निदर्शनास आले. या पालकांकडून प्रथम पत्नीच्या मुलाला योग्य मार्गदर्शन आणि वागणूक दिली गेली नाही त्यामुळे त्याला शाळेला न पाठवता मराठा जातीच्या एका कुटुंबामध्ये त्यांची जनावरे चारुन आणण्यासाठी चाकरीला ठेवले आहे. याचाच परिणाम म्हणून त्या मुलाला शिक्षणाच्या संधीला मुकावे लागले. त्याच - बरोबर काही वंचित आणि अवंचित मुलांचे पालक हयात नसल्याचे आढळून आले. ज्या कुटुंबातील मुलांचे वडिल हयात नाहीत अशा कुटुंबातील विधवा मातांनी पतीच्या पश्चात विघटित कौटुंबिक जीवन सावरण्यासाठी त्यांच्या मुलांचा आर्थिक, कौटुंबिक कार्यासाठी उपयोग करुन घेतला , त्यामुळे ब-याच विघटित कुटुंबातील मुलांना शिक्षणाला मुकावे लागले आहे. या शिवाय ज्या कुटुंबातील मुलांच्या माता हयात नव्हत्या अशा कुटुंबातील वडिलांनी पत्नीच्या पश्चात घरातील स्वयंपाक, झाडलोट,पाणी आणणे, जनावरे चारणे, लहान भावंडांना घेणे, शेतीची कामे करणे, लाकूड-फाटा गोळा करणे इत्यादी कामासाठी मुलांच्या पेक्षा मुलींचा उपयोग करुन घेतला , त्यामुळे मातेच्या मायेला व प्रेमाला मुकलेल्या लहान मुला-मुलींना घरातील अनेक कामे करावी लागल्यामुळे अशा विघटित कुटुंबातील बहुसंख्य मुले विशेषत: मुली शिक्षणापासून वंचित राहिलेल्या आढळून आल्या. मात्र वैवाहिक घटस्फोटित कौटुंबिक विघटित नसलेल्या आणि कौटुंबिक शांतता असलेल्या कुटुंबातील पालकांची बहुसंख्य मुले शिक्षण घेत असलेली आढळून आली. या विषयीची सविस्तर कल्पना खाली दिलेल्या तक्त्यातील माहितीच्या आधारे येईल.

| अनु. | जात | घटस्फो[illegible] | कौटुंबिक अंगातला | एकूण | दोन्ही दोन्ही लेख्याची |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराठा | – | ७(४३.७५) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | – | १(२०.००) | २(४०.००) | ५(१००.००) |
| ३ | लोहार | – | २(५०.००) | २(५०.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | – | ७(४६.६६) | ७(४६.६७) | १५(१००.००) |
| ५ | मांग | – | ४(३६.३७) | ६(५४.५५) | ११(१००.००) |
| ६ | चांभार | – | ५(५५.५६) | ६(६६.६७) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | — | २६(४३.३३) | ३०.५०.००) | ६०(१००.००) |

X आर्ई - किं[illegible]

| अनु. | जात | घटस्फो[illegible] | कौटुंबिक अंगातला | एकूण | दोन्ही लेख्यांची मिळून |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराठा | – | ५(३१.२५) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | – | १(२५.००) | १(२५.००) | ४(१००.००) |
| ३ | लोहार | – | १(२५.००) | १(२५.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | – | ७(५०.००) | ७(५०.००) | १४(१००.००) |
| ५ | मांग | – | ७(५३.८५) | ७(५३.८५) | १३(१००.००) |
| ६ | चांभार | – | ७(७७.७८) | ७(७७.७८) | ३(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | — | २८(४६.६६) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

* आई किंवा

वैवाहिक आणि कौटुंबिक स्थितीनुसार शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या कुटुंबाची पाहणी केली असता, तुलनेने अवंचित मुलांच्या कुटुंबाची परिस्थिती शैक्षणिक वातावरणाच्यादृष्टीने अनुकूल होती असे आढळून आले. वरील तक्ता क्रमांक ११ आणि १२ मधील माहितीनुसार वंचित मुलांच्या एकंदर ६० कुटुंबापैकी ८ कुटुंबे विघटित तर ६ कुटुंबामध्ये अंतर्गत भांडणाचे वातावरण होते. या उलट, अवंचित मुलांची अशी ६ विघटित आणि २ भांडण असणारी कुटुंबे होती. कौटुंबिक शांततेच्यादृष्टीने वंचित मुलांच्या ४५ तर अवंचित मुलांच्या ५२ कुटुंबामध्ये शांतता होती. पाहणीत असे आढळले की, मांग जातीच्या एका घटस्फोटित कुटुंबामध्ये मुलांच्या शिक्षणाचा विचार न केल्यामुळे त्यास वंचित रहावे लागले. थोडक्यात तुलनेने वंचित मुलांना त्यांच्या घरात कौटुंबिक वातावरण फारसे अनुकूल लाभले नव्हते.

जात पातळीवर वैवाहिक । कौटुंबिक स्थिती तपासली असता सुतार, चांभार आणि महार जातीच्या वंचित मुलांची अनुक्रमे ३ आणि प्रत्येकी २ कुटुंबे विघटित आढळली तर अवंचित मुलांची सांगाव खेड्यातील महार जातीची कुटुंबे वगळता मराठा जातीची २ आणि अन्य सर्व जातींच्या कुटुंबापैकी प्रत्येकी १ कुटुंब विघटित होते. तसेच मराठा आणि महार जातीच्या वंचित मुलांच्या अनुक्रमे ३ आणि २ तर अपवादाने चांभार जातीच्या अवंचित मुलांच्या फक्त एका कुटुंबात भांडणाचे वातावरण होते. त्याचप्रमाणे, तुलनेने, विशेष करुन वंचित मुलांच्या कुटुंबापेक्षा अवंचित मुलांच्या महार, मांग आणि मराठा या जातीच्या अनुक्रमे १०० टक्के ,९२.३० टक्के आणि ८१.२५ टक्के कुटुंबामध्ये शांततेचे वातावरण होते.

अशा प्रकारे वैवाहिक । कौटुंबिक स्थितीचे विश्लेषण केले असता, अवंचित मुलांच्या कुटुंबाच्या तुलनेत वंचित मुलांना कौटुंबिक वातावरणाची अनुकूलता कमी प्रमाणात उपलब्ध होती , असे नमूद करणे क्रमप्राप्त ठरते.

२ : घरातील लहान भावंडांना सांभाळण्याची जबाबदारी ---

अभ्यास केलेल्या दोन्ही खेड्यांमध्ये लहान भावंडाना सांभाळण्यासाठी घरी रहाणारी शैक्षणिकदृष्ट्या वंचित मुलांच्या पैकी बरीच मुले आढळली. मात्र अवंचित मुलांच्यापैकी अधुनमधून शाळा सोडून घरातील लहान भावंडाला सांभाळण्यासाठी घरी राहणाऱ्या मांग जातीच्या एका मुलाचा अपवाद वगळता कोणीही मुले आढळली नाहीत. लहान भावंडाना सांभाळण्याची जबाबदारी थोरल्या ५ ते ६ वर्षं वयाच्या मुलांच्यावर टाकून आई-वडिल शेतीच्या व अन्य कामासाठी जात असल्याचे पाहणीत आढळले. विशेषत: लहान भावंडाना सांभाळण्याची जबाबदारी मुलांच्यापेक्षा मुलीच्यावरच पालक सोपवित असल्याचे निदर्शनास आले. मुलींना घरातील लहान भावंडाना सांभाळण्याच्या जबाबदारीबरोबरच घरातील झाडलोट करणे,पाणी भरणे,स्वयंपाक करणे, जळणासाठी लाकूड-फाटा गोळा करणे, भांडी घासणे, कपडे धुणे इत्यादी लहान-मोठी कामे करावी लागतात यासाठी मुलांच्यापेक्षा मुलींचा उपयोग अधिक होतो म्हणून पालक मुलींनाच घरी ठेवून घेतात. याशिवाय मुला-मुलींना घर राखण करण्यासाठी घरी ठेवून घेत असल्याचे त्यांच्या पालकांनी सांगितले. काही पालकांच्या घराला दरवाजा,कडी-कोयंडा आणि कुलुप नसल्यामुळे घरातील धान्य,लाकुड-फाटा,शेतीची अवजारे व अन्य वस्तु चोरीला जावू नयेत म्हणून पालक मुलांना शाळेला न पाठवता घरी ठेवून घेत असल्याचे पाहणीत आढळले. मौजे - माळुंगे आणि मौजे - सांगाव या दोन्ही खेड्यातील सुतार जातीच्या कुटुंबातील विधवा मातांनी त्यांच्या मुलींना शाळेला न पाठविता घर राखण करण्यासाठी घरी ठेवून घेऊन स्वत: शेती काम आणि शेतमजूरीला जात असल्याचे सांगितले. थोडक्यात, घरातील लहान भावंडाना सांभाळण्यासाठी व घर राखण करण्यासाठी शैक्षणिकदृष्ट्या वंचित मुलांचा उपयोग अधिक होत असल्याचा पाहणीत आढळून आले. या संबंधी सविस्तर माहिती खालील तक्त्याच्या आधारे येऊ शकते.

घरातील लहान भावंडांना सांभाळण्याच्या जबाबदारीप्रमाणे पाहणी केली असता एकूण ६० प्रतिसादक - पालकांच्या मुलांपैकी लहान मुलांना सांभाळण्यासाठी घरी राहाव्या लागणाऱ्या वंचित मुलांचे प्रमाण १७ ( म्हणजे २८.३४ टक्के ) तर अवंचितामधून फक्त १ आढळले. त्याची जात पातळीवर तपासणी केली असता मराठा ६ ( म्हणजे ३७.५० टक्के ),महार ५ (म्हणजे ३३.३३ टक्के ),मांग ३ (म्हणजे २७.२८ टक्के ), चांमार २ (म्हणजे २२.२२ टक्के )आणि सुतार १ (म्हणजे २०.०० टक्के ) जातीतील वंचित मुलींना लहान मुलांना घेण्यासाठी घरी ठेवावे लागत असल्याचे त्यांच्या पालकांनी सांगितले. त्याच बरोबर अवंचित मुलांच्या एकूण ६० प्रतिसादक-पालकांच्या मुलांपैकी मांग जातीतील फक्त १ (म्हणजे ११.११ टक्के ) मुलाला,लहान मुलांला सांभाळण्यासाठी शाळा बंद करुन अधून-मधून घरी ठेवून घेत असल्याचे त्याच्या पालकाने सांगितले. विशेषत: लहान मुलांना सांभाळण्यासाठी घरी राहाणाऱ्या सर्व मुलीच असल्याचे आढळून आले, हे विशेषत्वाने ध्यानात घेण्यासारखी बाब आहे. यावरुन मुलांच्या तुलनेत मुलींना शिक्षणापासून वंचित राहाण्यावर परिणाम होत असल्याचे स्पष्ट होते. आणि मौजे-सांगाव खेड्यातील (६ म्हणजे १०.०० टक्के ) वंचित मुलांच्या पेक्षा मौजे-म्हाकुंगे खेड्यातील (११ म्हणजे १८.३४ टक्के ) वंचित मुलांना लहान मुलांना सांभाळण्यासाठी घरी टेवून घेतले जात होते.

(ह) <u>शैक्षणिक पार्श्वभूमि</u> :

खेड्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण शहरी साक्षरतेपेक्षा कमी आहे. ग्रामीण पर्यावरणामध्ये मुलांच्या शिक्षणाचा त्यांच्या पालकांच्याकडून फारसा विचार होत नाही.पाहणी केलेल्या दोन्हीही खेड्यामध्ये जवळ-जवळ निम्यापेक्षा अधिक लोक निरक्षर असल्याचे दिसून आले. पैकी स्त्री-साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प म्हणजे जवळ-जवळ २० टक्केच असल्याचे निदर्शनास आले. या निरक्षर आणि अज्ञान पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे महत्व आणि जाणीव फारशी असत नाही.या पालकांच्याकडून मुलांच्या शिक्षणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात नाहीत.खेड्यातील पालकांना शेती व अन्य स्वरुपाच्या कामाच्या व्यापातून त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देणे शक्य होत नाही. दोन्ही खेड्यामध्ये काही पालक तर असे आढळले की त्यांचा मुलगा रोज शाळेला जातो की नाही,घरी अभ्यास करतो की नाही याची साधी चौकशीसुध्दा करत नाहीत.

अशा काही पालकांना त्यांच्या मुलांच्या भविष्याविषयीची चिंता असत नाही. अर्थात, अशा निरक्षर व अज्ञानी पालकांच्याकडून त्यांची बरीच मुले शैक्षणिकदृष्ट्या दुर्लक्षित राहून शिक्षणापासून वंचित राहिलेली आढळली. त्याचबरोबर काही पालकांनी त्यांच्या मुलांना शिकविण्याची इच्छा व्यक्त करूनही त्यांच्या कुटुंबाचे दारिद्र्य, उनाड मुलांची संगत, घरची, शेतीची व अन्य स्वरूपाची कामे मुलांना करावी लागत असल्यामुळे मुलांना शिकवता आले नसल्याचे त्यांच्या पालकांनी सांगितले. या उलट साक्षर पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे महत्व आणि जाणीव असल्याने ते त्यांच्या मुलांना शिकवत असल्याचे दिसून आले. याचाच परिणाम म्हणून अज्ञानी व निरक्षर पालकांची मुले अधिक वंचित तर साक्षर पालकांची मुले अल्प वंचित असल्याचे आढळले. थोडक्यात, पालकांचा त्यांच्या मुलांच्या शिक्षणाविषयीचादृष्टीकोन आणि त्यांच्या मुलांना असलेली शाळेची आवड याबाबीवर दृष्टिक्षेप टाकला असता शैक्षणिक पार्श्वभूमिची कल्पना सविस्तर स्पष्ट होऊ शकते.

## १ : पालकांचा त्यांच्या मुलांच्या शिक्षणाविषयीचा दृष्टिकोण --

साक्षरतेत वृध्दी करण्याच्यादृष्टिने शासनाने शिक्षण प्रसाराला गती देण्याचे प्रयत्न सुरु केले असतानाही विशेषत: ग्रामीण विभागातील लोकांच्याकडून शिक्षणप्रसाराला अनुकूल असा प्रतिसाद मिळू शकत नाही. कारण खेड्यातील मुलांच्या शिक्षणाचा त्यांच्या नोकरीधंद्यासाठी फारसा विचार समाजात केला जात नाही. त्यामुळे पालक त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाबद्दल फारसे जागरुक राहत नाहीत. पालकांना मुलांच्या शिक्षणाचा त्यांच्या जीवनात निरुपयोग वाटत असल्याने त्यांच्या मनामध्ये शिक्षणाबद्दल उदासपणाची वृत्ती निर्माण झाल्याचे दिसते. मुलांनी शिक्षण घेऊन भविष्यात त्यांना नोकरी न मिळण्याची आणि शिक्षणाचा त्यांच्या जीवनात निरुपयोग असल्याची बेजबाबदारपणाची भावना पालकांच्या मनात घर करुन बसली आहे. मुलांच्या शिक्षणाचा त्यांच्या जीवनातील निरुपयोग आणि खेड्यातील मुलांचा अगुणात्मक शैक्षणिक विकास यांचा कारण-कार्यसंबंध जोडला तर फारसे वावगे

ठरणार नाही असे मला वाटते. थोडक्यात सेड्यातील मुलांचा गुणात्मक शैक्षणिक विकास साधण्यासाठी फारसा प्रयत्न होत नसल्याने मुलांना स्पर्धात्मक जीवनात नोकरी धंदा प्राप्त होऊ शकत नाही. याचाच परिणाम म्हणून पालकांना त्यांच्या मुलांचे शिक्षण भविष्य जीवनात निरुपयोगी वाटते. अर्थात, शिकून नोकरी मिळणार नाही असा विचार करणाऱ्या पालकांची बरीच मुले शैक्षणिकदृष्ट्या दुर्लक्षित राहातात. दोन्हीही सेड्यातील शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या काही पालकांनी ही खंत बोलून दाखवली. याशिवाय काही पालकांनी त्यांच्या मुलांना शिकवावे वाटत असूनही मुलांचे मोठे वय झाल्याने, घरच्या व शेतीच्या कामासाठी मुलांचा उपयोग होत असल्याने त्यांना शिकवावे वाटत नसल्याचेही सांगितले. यासंबंधीची स्पष्ट कल्पना खालील तक्त्याच्या आधारे येऊ शकते.

तक्ता क्रमांक - १३ : वैकिल मुलांचे घरातील लहान भावंडांना सांभाळण्याच्या जबाबदारीप्रमाणे विभाजन --

| अनु. | जात | मौजे - सोंगाव | | | मौजे - म्हाळुंगी | | | दोन्ही खेड्यांची मिळून |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लहान भावंडांना सांभाळण्यासाठी घरी राहणारी मुले | लहान भावंडांना सांभाळण्यासाठी घरी न राहणारी मुले | एकूण | लहान भावंडांना सांभाळण्यासाठी घरी राहणारी मुले | लहान भावंडांना सांभाळण्यासाठी घरी न राहणारी मुले | एकूण | |
| १ | मराठा | ३(१८.७५) | ६(३७.५०) | ९(५६.२५) | ३(१८.७५) | ४(२५.००) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | १(२०.००) | २(४०.००) | ३(६०.००) | — | २(४०.००) | २(४०.००) | ५(१००.००) |
| ३ | लोहार | — | २(५०.००) | २(५०.००) | — | २(५०.००) | २(५०.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | २(१३.३३) | ६(४०.००) | ८(५३.३३) | ३(२०.००) | ४(२६.६७) | ७(४६.६७) | १५(१००.००) |
| ५ | मांग | — | ५(४५.४५) | ५(४५.४५) | ३(२७.२८) | ३(२७.२७) | ६(५४.५५) | ११(१००.००) |
| ६ | चांभार | — | ३(३३.३३) | ३(३३.३३) | २(२२.२२) | ४(४४.४५) | ६(६६.६७) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | ६(१०.००) | २४(४०.००) | ३०(५०.००) | ११(१८.३४) | १९(३१.६६) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

तक्ता क्रमांक १५ : वंचित मुलांच्या पालकांचा त्यांच्या मुलांच्या शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन —

| अनु. | जात | मौजे - सांगाव | | | मौजे - म्हाळुंगी | | | दोन्ही खेड्यांची |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुलांना शिकवावे वाटणारे पालक | मुलांना शिकवावे न वाटणारे पालक | एकूण | मुलांना शिकवावे वाटणारे पालक | मुलांना शिकवावे न वाटणारे पालक | एकूण | |
| १ | मराठा | ६(३७.५०) | ३(१८.७५) | ९(५६.२५) | ५(३१.२५) | २(१२.५०) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | १(२०.००) | २(४०.००) | ३(६०.००) | १(२०.००) | १(२०.००) | २(४०.००) | ५(१००.००) |
| ३ | लोहार | १(२५.००) | १(२५.००) | २(५०.००) | २(५०.००) | — | २(५०.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | ३(२०.००) | ५(३३.३३) | ८(५३.३३) | ५(३३.३४) | २(१३.३३) | ७(४६.६७) | १५(१००.००) |
| ५ | मांग | १( ९.०९) | ४(३६.३६) | ५(४५.४५) | ४(३६.३६) | २(१८.१८) | ६(५४.५५) | ११(१००.००) |
| ६ | चांभार | — | ३(३३.३३) | ३(३३.३३) | ५(५५.५६) | १(११.११) | ६(६६.६७) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | १२(२०.००) | १८(३०.००) | ३०(५०.००) | २२(३६.६७) | ८(१३.३३) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

पालकांचा त्यांच्या मुलांच्या शिक्षणाविषयीचा दृष्टिकोन तपासला असता अवंचित मुलांच्या सर्व जातीच्या पालकांनी त्यांच्या मुलांना शिकवावे वाटत असल्याचे सांगितले. मात्र, वंचित मुलांच्या एकूण ६० प्रतिसादक पालकांपैकी २६ ( म्हणजे ४३.३३ टक्के ) पालकांनी त्यांच्या मुलांना शिकवावे वाटत नसल्याचे सांगितले. मुलांच्या शिक्षणाविषयी उदासीनता व्यक्त करणाऱ्या पालकामध्ये सर्वाधिक प्रमाण सुतार जातीच्या ३ ( म्हणजे ६०.०० टक्के ) आणि त्यानंतर मांग ६ ( म्हणजे ५४.५५ टक्के ) महार ७ ( म्हणजे ४६.६६ टक्के ) आणि चांभार ४ ( म्हणजे ४४.४४ टक्के ) या अनुसूचित जातीच्या पालकांमध्ये आढळून आली. यावरुन अजूनही शिक्षणाचे महत्व काहींच्या ध्यानी आले नाही असे दिसते.

२ : मुलांची शाळेची आवड --

पाहणी केलेल्या दोन्हीही खेड्यातील मुलांच्या बऱ्याच पालकांनी सांगितले की मुलांना शालेय वातावरणाची भिती वाटते. मुलांना गुरुजींच्या नियंत्रणाखाली जवळजवळ आठ तास चार भितींच्या आत कोंडून राहावेसे वाटत नाही. अशी बरीच मुले वारंवार शाळा सोडून घरी राहातात. काही पालकांनी सांगितल्याप्रमाणे गैरहजर राहाणाऱ्या मुलांना गुरुजींनी रागावले व प्रसंगी मारल्यामुळे मुले घाबरुन परत शाळेला गेली नाहीत. यावरुन काही मुलांना शाळेची आवड नाही हे स्पष्ट दिसते. मौजे-सांगाव खेड्यातील महार जातीच्या आणि मराठा जातीच्या दोघा पालकांनी त्यांच्या मुलांना शाळेतील गैरहजेरीबद्दल गुरुजींनी मारल्यामुळे मुलांची शाळा बंद केल्याचे सांगितले. यावरुन गैरहजर राहाणाऱ्या मुलाला मुळात शाळेची आवड नसते. शिवाय काही पालक गुरुजींच्यावर राग करुन त्यांच्या मुलांना शाळेत परत पाठवत नाहीत. शिवाय शेती काम, घरकाम व अन्यकामामध्ये पालकांना साहाय्य करणाऱ्या मुलांना रोज शाळेत उपस्थित राहणे शक्य होत नाही अशा मुलांमध्ये शाळेची आवड असत नाही व शेवटी अशी मुले कायमची शिक्षणापासून वंचित राहातात. या संबंधीचे सविस्तर अवलोकन तक्ता क्रमांक १५ वरुन करता येईल.

तक्ता क्रमांक १५ : मुलांच्या शाळेच्या आवडीप्रमाणे वंचितांचे विभाजन —

| अनु. | जात | मौजे - सांगाव | | | मौजे - महाळुंगी | | | दोन्ही वस्त्यांची मिळून |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शाळेची आवड असणारी मुले | शाळेची आवड नसणारी मुले | एकूण | शाळेची आवड असणारी मुले | शाळेची आवड नसणारी मुले | एकूण | |
| १ | मराठा | — | ९(५६.२५) | ९(५६.२५) | ३(१८.७५) | ४(२५.००) | ७(४३.७५) | १६(१००.००) |
| २ | सुतार | १(२०.००) | २(४०.००) | ३(६०.००) | १(२०.००) | १(२०.००) | २(४०.००) | ५(१००.००) |
| ३ | लोहार | — | २(५०.००) | २(५०.००) | — | २(५०.००) | २(५०.००) | ४(१००.००) |
| ४ | महार | २(१३.३३) | ६(४०.००) | ८(५३.३३) | १( ६.६७) | ६(४०.००) | ७(४६.६७) | १५(१००.००) |
| ५ | मांग | — | ५(४५.४५) | ५(४५.४५) | १(०९.१०) | ५(४५.४५) | ६(५४.५५) | ११(१००.००) |
| ६ | ढोमार | — | ३(३३.३३) | ३(३३.३३) | — | ६(६६.६७) | ६(६६.६७) | ९(१००.००) |
| एकूण टक्केवारी | | ३(०५.००) | २७(४५.००) | ३०(५०.००) | ६(१०.००) | २४(४०.००) | ३०(५०.००) | ६०(१००.००) |

मुलांच्या शाळेच्या आवडीविषयी माहिती संपादन केली असता वंचित मुलांच्या एकूण ६० प्रतिसादकांपैकी शाळेची आवड नसलेल्या वंचित मुलांची संख्या ५१( म्हणजे ८५.०० टक्के ) आढळली. आणि ज्यांच्यात आवड होती, त्या उरलेल्या ९ म्हणजे मुली होत्या, ही बाब उल्लेखनीय आणि तशीच लक्षात घेण्याजोगी आहे. शाळेची आवड नसलेल्या वंचित मुलांची जात पातळीवर तपासणी केली असता चांभार ९ (म्हणजे १००.०० टक्के ), लेहार ४ ( म्हणजे १००.०० टक्के ),मांग १० ( म्हणजे ९०.९० टक्के ), मराठा १३ ( म्हणजे ८१.२५ टक्के ), महार १२ (म्हणजे ८०.०० टक्के ) आणि सुतार ३ ( म्हणजे ६०.०० टक्के ) जातीच्या वंचित मुलांना शाळेची आवड नसल्याचे आढळले. तर या उलट अवंचित मुलांच्या ६० प्रतिसादक-पालकांपैकी केवळ २ मुलांमध्ये शाळेची आवड अपेक्षेप्रमाणे नसल्याचे त्यांच्या पालकांच्याकडून सांगण्यात आले.

३ : प्रौढ शिक्षण कार्यक्रमाची माहिती असणारे पालक --

पालकांना प्रौढशिक्षण कार्यक्रमाची माहिती आहे की नाही यासंबंधी तपासणी केली असता १२० प्रतिसादक-पालकांपैकी प्रौढशिक्षण कार्यक्रमाची माहिती असलेले केवळ ८ पालक आढळले. यावरून प्रौढशिक्षण कार्यक्रमाची माहिती नसणारे बहुसंख्य पालक होते. त्याचप्रमाणे अभ्यासासाठी निवडलेल्या दोन्हीही खेड्याच्या वंचित आणि अवंचित मुलांच्या १२० प्रतिसादक-पालकांपैकी कोणाही पालकाने प्रौढशिक्षण घेण्याची इच्छा व्यक्त केली नाही. निरक्षर पालकांच्यामधील साक्षर होण्यासंबंधीची उदासीनता लक्षात घेता पालकांच्या ध्यानी शिक्षणाचे महत्व आले नाही, असे म्हणण्यास जागा आहे. हीसुध्दा बाब मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास कारणीभूत ठरणारी आहे.

थोडक्यात, पालकांचा शिक्षणविषयक उदासीनदृष्टिकोन,मुलांना शाळेची आवड नसणे, पालकांची निरक्षरता आणि अज्ञान या घटकांच्यावर दृष्टिक्षेप टाकल्यानंतर मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या पालकांच्या शैक्षणिक पार्श्वभूमिचे सम्यक् आकलन होते.

( इ ) इतर कारणे --

मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास सामाजिक परिस्थिती,आर्थिकस्थिती, कौटुंबिक पर्यावरण आणि शैक्षणिक पार्श्वभूमि इत्यादी प्रमुख घटकांच्या बरोबरच मुलांचे मित्र, मुलांचे अगर कुटुंबसदस्यांचे आजारपण, मुलांची मंद बुध्दि, दूरदर्शन प्रसार, मुलांची स्वेच्छावृत्ति आणि शारीरिक व्यंग इत्यादी इतर काही कारणेही जबाबदार असल्याचे दोन्ही लेख्यांच्या पाहणीमध्ये आढळून आले. या कारणाचा थोडक्यात परामर्श घेतल्यानंतर मुलांच्या शैक्षणिक वंचिततेची कल्पना स्पष्ट होऊ शकते.

(१) मुलांचे मित्र --

मुलांच्या मैत्रिच्या संदर्भात माहिती करुन घेतली असता वंचित मुलांचे शाळेत न जाणारे मित्र ४५ ( म्हणजे ७५.०० टक्के ) तर अवंचित मुलांचे शाळेत नियमित जानारे मित्र ४७ ( ७८.३३ टक्के ) होते. वंचित मुलांच्या शाळेत न जाणा-या मित्रांची जातपातळीवर तपासणी केली असता चांभार ८ ( म्हणजे ८८.८९ टक्के ), मांग ९ ( म्हणजे ८१.८१ टक्के ) , सुतार ४ ( म्हणजे ८०.०० टक्के ) , मराठा १२ ( म्हणजे ७५.०० टक्के ), लोहार ३ ( म्हणजे ७५.०० टक्के ) आणि महार ९ ( म्हणजे ६०.०० टक्के ) जातीतील शाळेला न जाणारे मित्र आढळले. त्याचबरोबर शाळेत नियमित जाणाऱ्या अवंचित मुलांची जातपातळीवर तपासणी केली असता मांग १२ (म्हणजे ९२.३० टक्के ), महार ११ (म्हणजे ७८.५८ टक्के ) आणि चांभार ७ ( म्हणजे ७७.७८ टक्के ) या अनुसूचित जातीतील मित्र अधिक, तर त्या खालोखाल मराठा १२ (म्हणजे ७५.०० टक्के ) सुतार ३(म्हणजे ७५.०० टक्के ) आणि लोहार २ (म्हणजे ५०.०० टक्के ) जातीतील मित्र आढळले.यावरुन वंचित मुलांचे शाळेत न जाणारे मित्र आणि अवंचित मुलांचे शाळेत नियमित जाणारे मित्र अधिक असल्याचे स्पष्ट दिसते.

( २ ) मुलांचे अगर कुटुंब सदस्यांचे आजारीपण --

पाहणी केलेल्या दोन्हीही खेड्यामध्ये लहानपणापासूनच मुलगा वारंवार आजारी पडत असल्याने त्याला शाळेला पाठविता आले नसल्याचे काही पालकांनी सांगितले. मोजे म्हाळुंगे खेड्यातील एका मांग जातीच्या पालकाने मुलगा वारंवार अजारी पडत असे म्हणून त्याला शिकवता आले नाही असे सांगितले. शिवाय म्हाळुंगे खेड्यातील सुतार जातीच्या पालकाने सांगितले की, वायाच्या आजारामुळे त्यांना दवाखान्यात बरेच दिवस राहावे लागले होते त्या काळात मुलाला घरातील आणि शेतीची कामे करावी लागली व काही वेळेला पालकांच्या सेवेसाठी दवाखान्यातही राहावे लागले. त्यामुळे त्याला शाळेला जाता आले नाही. मोजे-सांगाव खेड्यातील एका मराठा जातीच्या पालकाने सांगितल्याप्रमाणे मुलाला फिट येत असे त्यामुळे त्याला शाळेला पाठविणे शक्य झाले नसल्याचे सांगितले. थोडक्यात , मुलांचे अगर कुटुंबातील कुटुंबसदस्यांच्या आजारीपणामुळे मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागल्याचे निदर्शनास आले.

( ३ ) मुलांची मंद बुध्दि --

पाहणीमध्ये काही पालकांनी मुलांची मंद बुध्दि हे मुलांना शिक्षणा-पासून वंचित ठेवण्यास जबाबदार कारण असल्याचे निदर्शनास आणून दिले. वंचित मुलांच्या ब-याच पालकांनी सांगितल्याप्रमाणे, मुलांना गुरुजींनी शिकविलेले वाचता व लिहिता येत नाही. शिवाय दोन तीन वर्ष परीक्षा देऊनही नापास झाल्यामुळे त्यांनी शाळेला जाणे बंद केले. प्रत्येक वर्षी नापास होणा-या मुलांची शाळा त्यांच्या पालकांनीच बंद केल्याचे सांगितले. अर्थात् मंदबुध्दि हे मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास जबाबदार कारण आहे.

( ४ ) दूरदर्शन प्रसार --

कोल्हापूरला दूरदर्शन केन्द्र उभे झाल्यानंतर मोजे-सांगाव आणि मोजे-

म्हाळुंगे खेड्यातील काही ठराविक पालकांनी टी.व्ही.घेतल्याचे दिसून आले. वंचित मुलांच्या पालकांनी सांगितल्याप्रमाणे, गावामध्ये टी.व्ही.आल्यामुळे काही मुले शाळेला न जाता टी.व्ही.वरील क्रिकेटचा खेळ पाहणे, चित्रपट पहाणे, व अन्य कार्यक्रम पाहणे यामध्ये मुले आपला वेळ घालवतात आणि शाळेला जाणे टाळतात. शिवाय सकाळी,संध्याकाळी आणि सुट्टीच्या दिवशी मुले टी.व्ही. चे कार्यक्रम बघत असतात, त्यामुळे मुले शाळेचा अभ्यास करित नसल्याचेही काही पालकांनी सांगितले. अर्थात, दूरदर्शन प्रसाराचा मुलांच्या शिक्षणावर अनिष्ट परिणाम झाला असल्याचेही पाहणी अंती आढळून आले.

( ५ ) मुलांची खेळाडूवृत्ती ---

मुलांना खेड्यातील मोकळ्यावातावरणात खेळाची सवय जडलेली असते. शिवाय दूरदर्शन वरील क्रिकेटचे खेळ पाहून काही मुले एकत्र जमा होऊन शाळेला न जाता दिवसभर क्रिकेट खेळण्यात रमतात, असे काही पालकांनी सांगितले. विशेषत: निरक्षर व अज्ञानी आणि कामाच्या व्यापातून मुलांच्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या पालकांची बरीच मुले शाळेला न जाता उनाड मुलांच्या संगतीने दिवसभर खेळत असल्याचे आढळून आले. मौजे-सांगाव आणि मौजे म्हाळुंगे खेड्यातील अनुसूचितजातीची बरीच मुले शाळा सोडून एखाद्या घरात किंवा झाडा-खाली पत्त्यानी दिवसभर खेळत असलेली माझ्या निदर्शनास आली. शिवाय पत्त्यांनी खेळण्यात मुलांचे काहीअंशी पालकही सहभागी झाल्याचे आढळून आले. अर्थात्, पालकांच्याकडून दुर्लक्षित होणाऱ्या अनेक मुलांना इष्ट-अनिष्ट खेळांची सवय लागल्यामुळे त्यांना शिक्षणापासून वंचित राहाणे भाग पडले असल्याचे स्पष्ट होते.

( ६ ) शारीरिक व्यंग --

पाहणी केलेल्या दोन्हीही खेड्यामध्ये काही मुले शारीरिक व्यंग असल्यामुळे त्यांना शिकवता आले नसल्याचे त्यांच्या पालकांनी सांगितले.

पाहणीमध्ये मला काही मुले मुकी, बोबडी बोलणारी, बहिरी, दृष्टी-दोष असणारी, आणि हात किंवा पाय लुळा असलेली आढळली. या सर्व मुलांच्या पालकांनी त्यांच्या शारीरिक व्यंगपणामुळे शिकवता आले नसल्याचे सांगितले. याशिवाय मौजे-म्हाळुंगे खेड्यातील एका पालकांच्या मुलाचे डोकीचे केस पांढरे होते या मुलांला शाळेतील इतर मुले आजोबा म्हणून चिडवितात म्हणून लाजून त्याने शाळेला जाने बंद केले असल्याचे त्याच्या पालकांने सांगितले. थोडक्यात, शारीरिक व्यंगत्व मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास कारणीभूत ठरते हे स्पष्ट होते.

## सा रां श ----

मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या कारणांवर प्रकाश टाकला असता कौटुंबिक दारिद्र्य, प्रतिकुल सामाजिक पर्यावरण, कौटुंबिक अस्थिरजीवन, पालकांची अशैक्षणिकता आणि मुलांच्या शिक्षणाविषयी पालकांचा बेजबाबदारपणा असे प्रमुख आणि अन्य इतर प्रभावी घटक मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास जबाबदार ठरले असल्याचे दोन्ही खेड्यांच्या प्रत्यक्ष पाहणीअंती उजेडात आले.

..